PARLE MAHOTSAV

Organiser - **ADV. PARAG ALAVANI,** MLA, President - Vile Parle Cultural Centre
2, Amber Palace, Chittaranjan Road, Vile Parle (East), Mumbai 400 057.
Tel.: 26136513, 26177125 • Website : www.parlemahotsav.com

PARLE MAHOTSAV


# कृपया प्रसिद्धीसाठी

## सर्वांमधील कलागुण बहरत आहेत

## २० व्या पार्ले महोत्सवात नवजात बाळ ते जेष्ठ नागरिक महिला व पोलिसांचा ही सहभाग

मुंबई दि. २५ : नवजात बाळ ते जेष्ठ नागरिक तसेच महिला, युवा व पोलीसांचा सहभाग २० व्या पार्ले महोत्सवाचे आकर्षण ठरत आहे. 'प्रत्येकामध्ये आहे काहीतरी खास' या महोत्सवाच्या घोषवाक्यानुसार प्रत्येकाच्या आवडीच्या स्पर्धांचा समावेश असण हेच पार्ले महोत्सवाच वैशिष्ट्य असल्याचे प्रमुख आयोजक पराग अळवणी म्हणाले. याच सोबत निकोप स्पर्धा व्हावी यासाठी अधिकाधिक वयोगट तसेच निपक्ष स्पर्धेसाठी नियमांच्या काटेकोर पालनामुळे व्यावसायीक स्पर्धकांसह हौशी स्पर्धकही महोत्सवात आवर्जून येतात असेही ते म्हणाले.

महोत्सवातील अत्यंत गोंडस (Cute) वैशिष्ट्य म्हणजे सुदृढ बालक स्पर्धेतील स्पर्धक असलेल्या नवजात बालकास त्याचे पालक व आजी आजोबा घेऊन येतात तर जेष्ठ नागरिक स्पर्धेतील स्पर्धकांसाठी त्यांची नातवंडे आवर्जून येतात. तसेच महिलांसाठीच्या स्पर्धेत त्यांचे कौतुक करायला त्यांचे पतीही हजेरी लावून महोत्सवात एक परिपूर्ण कौटुंबीक वातावरण निर्माण करतात.

सुदृढ बालक स्पर्धेमध्ये सुमारे २५० स्पर्धकांनी सहभाग घेतला तर त्यांचे गुण ठरवण्यासाठी उंची, वजन, अन्य आरोग्य व वागण्यातील निकष तपासायला डॉक्टर्स तसेच नानावटी नर्सिंग महाविद्यालयाच्या विद्यार्थिनीही सहभागी होतात.

महिलांसाठी तसेच जेष्ठ नागरिकांसाठी वन मिनिट गेम्सच्या माध्यमातून वैयक्तिक तसेच टीम्स पाडून काही समूह स्पर्धा घेण्यात येतात. अनेक दिवसांनंतर 'धम्माल' केली अशी प्रतिक्रिया यावेळी सर्व महिला स्पर्धक आवर्जून देतात. तर जेष्ठ नागरिक आपले वय विसरून बालपण जगण्याचा आनंद घेतात. मुख्य म्हणजे जेष्ठ नागरिकांना आनंद लुटताना पाहून प्रेक्षक व कार्यकर्तेही हरवून जातात.

यंदाचे अणखीन एक आकर्षण ठरले ते पार्ले महोत्सव मधील 'पार्ले पोलीस ठाणे' व 'ओशिवरा पोलीस ठाणे' यामधील खेळला गेलेला 'प्रेक्षणीय क्रिकेट' सामना. आपल्या सुरक्षेसाठी अहोरात्र मेहनत करणारे पोलीस आज स्वतःसाठी थोडा वेळ काढून खेळायला आले असल्याचे कळताच प्रेक्षकांनीही त्यांना जोरदार प्रोत्साहन दिले.

# PARLE MAHOTSAV

Organiser - **ADV. PARAG ALAVANI,** MLA, President - Vile Parle Cultural Centre
2, Amber Palace, Chittaranjan Road, Vile Parle (East), Mumbai 400 057.
Tel.: 26136513, 26177125 • Website : www.parlemahotsav.com


PARLE MAHOTSAV